देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाचे,
**न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं.रा. सप्रे वाणिज्य आणि विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, (स्वायत्त)**
**कै.काकासाहेब पंडीत शैक्षणिक संकुल. देवरूख. ४१५ ८०४ (जि. रत्नागिरी)**
**मुंबई विद्यापीठ सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २००९-१०**
Reaccredited by NAAC with ‘A’ Grade-3rd Cycle

डॉ.नरेंद्र पर्शुराम तेंडोलकर एम.एस्सी.पीएच.डी.
प्राचार्य

जा.क्र.वरिष्ठ /४७३/ २०१९-२०
दिनांक : १३/११/२०१९

# महाविद्यालय विकास समिती
## वार्षिक अहवाल २०१८-१९

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या २ बैठकी पार पडल्या सदर बैठकीत झालेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- महाविद्यालय विकास समितीची प्रथम सभा दि.११/०९/२०१८ रोजी पार पडली.
  - पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५/०२/२०१८ च्या सभेतील कामकाजाची माहिती सभे समोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
  - एप्रिल/मे २०१८ चा पदवी विभागाचा विद्यापीठ निकाल सभेसमार सादर करण्यात आला.
  - सद्यस्थितीमध्ये महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेले शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम व त्यासाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व मनुष्यबळ या विषयी सविस्तर चर्चा होऊन कार्यभारानुसार आवश्यक मनुष्यबळ नेमण्यासंबधी ठरविण्यात आले.
  - आगामी पाच वर्षामध्ये शैक्षणिक गुणवत्तेमध्ये सर्वांगीण वाढ होण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधांचा, विकास व उपक्रमांचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला.
  - विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसऱ्या व चौथ्या दुरूस्तीच्या अधिसुचनेनुसार महाविद्यालय स्तरावरील आश्वासीत प्रगती योजनेच्या अर्हता व नविन अझख च्या गुणांकन पद्धतीमध्ये झालेला बदल यावर चर्चा होऊन यु.जी.सी. ने केलेला बदल स्विकारण्यात आला .
  - आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमाखर्च पत्रक, ताळेबंद यांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.
  - दि. ०१/०१/२०१८ ते ३१/०५/२०१८ या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नयमाबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.

- ➢ परिविक्षाधीन कालावधी पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यंच्या सेवा कायम करण्यासाठी नियामक मंडळाला शिफारस करणेबाबत ठरविण्यात आले.
- ➢ महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा अहवाल , वर्ष २०१८-१९ चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले.
- ➢ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी महाविद्यालयातील संगणक विज्ञान व पद्व्युत्तर विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यभारानुसार नियुक्ती व वेतन निश्चिती करण्यासंबधी चर्चा व ठराव करण्यात आला.
- ➢ संस्थानियुक्त (विनाअनुदान) विभागात २ वर्षापेक्षा अधिक सलग सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या कालावधीतील वेतनाबाबत चर्चा करून नियामक मंडळाकडे शिफारस करण्याचे ठरविण्यात आले.
- ➢ डिजीटल इंडीया योजनेअंर्तगत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपस्थितीसाठी डिजीटल ओळखपत्राच्या माध्यमातून डिजीटल पद्धतीने उपस्थिती घेण्यात यावी असे ठरविण्यात आले.
- ➢ महाविद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी / कर्मचारी प्रतिनिधी यांच्याकडून आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली.
- ➢ मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा व निर्णय घेण्यात आले.

- महाविद्यालय विकास समितीची द्वितीय सभा दि. ३१/०३/२०१९ रोजी पार पडली.

महाविद्यालयाने यु.जी.सी.कडे सादर केलेल्या स्वायत्तता प्रस्तावासंबधीची पडताळणी समिती महाविद्यालयाला दि.०३ व ०४ फेब्रुवारी २०१९ रोजी भेट देऊन गेली. सदर समितीने यु.जी.सी. ला सादर केलेल्या अहवालानुसार महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून दहा वर्षांसाठी **स्वायत्तता** बहाल करण्यात आल्याचे प्राचार्यांनी सभेला सांगितले व त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष यांनी याचे श्रेय महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे असल्याचे सांगुन त्यांच्या भावना यासमितीने सर्व कर्मचाऱ्यांपर्यत पोहोचवाव्यात अशी विनंती केली व सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

- ➢ महाविद्यालय विकास समितीच्या दिनांक ११/०९/२०१८ च्या सभेतील इतिवृत्ताचे वाचन व त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.
- ➢ आर्थिक वर्ष २०१९-२० चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे अंदाजपत्रक सभेसमोर सादर करण्यात आले व त्यास मंजुरी देण्यात आली.
- ➢ दि.०१/०६/२०१८ ते ३१/१२/२०१८ या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नयमाबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.

- शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये रिक्त पदांवर नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा–यांना शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी पात्र व्यक्तींना संस्थेच्या सेवेमध्ये तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीला मंजुरी देण्यात आली.
- महाविद्यालयाचा जून २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीतील शैक्षणिक, सहशैक्षणिक व अभ्यासेतर विभागातील कामकाजाचा सविस्तर तपशिल सादर करण्यात आला.
- महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचे समन्वयक यांनी नॅक च्या अनुषंगाने महाविद्यालयामध्ये मागील वर्षभर संपन्न झालेल्या कामकाजाचा आढावा घेतला व तसेच स्वायत्तते संदर्भात महाविद्यालयाने केलेल्या कामाचा आढावा घेतला.
- महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडुन महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून दहा वर्षासाठी स्वायत्तता बहाल केल्याचे सभेला सांगितले यावर सविस्तर चर्चा होऊन ही नविन जबाबदारी स्विकारून सदरचा ठराव पुढील कार्यवाहीसाठी नियामक मंडळाकडे पाठविण्यात यावा असे ठरविण्यात आले.
- महाविद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी / कर्मचारी प्रतिनिधी यांच्याकडून आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली.
- मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा व निर्णय घेण्यात आले.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE
DEVRUKH

प्राचार्य